अपील २०९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०९ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. अरविंद सखाराम पाटील<br>जी ३/ बी २, साईसंकुल, फेज-२, गोदरेज हिल रोड,<br>खडकपाडा, कल्याण (पश्चिम), जि. ठाणे |
| ३ | जन माहिती अधिकारी | ग्रामसेवक, चिमणे ता. आजरा, जि. कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी, पंचायत समिती आजरा, जि. कोल्हापूर |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>श्री. विष्णू चव्हाण यांनी मौजे चिमणे, ता. आजरा येथे त्यांच्या घरालगत व लगतच्या रस्त्यावर केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबतची माहिती | |

अपीलकर्ता गैरहजर. जन माहिती अधिकाऱ्यानी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करून दिली असल्याचे नमूद केले आहे. अनधिकृत बांधकामाबद्दल कारवाई करावी, ही अपीलकर्त्याची मुख्य मागणी आहे. ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही. मात्र याअनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, आजरा, जि. कोल्हापूर यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना सादर करून त्याची प्रत अपीलकर्त्यास पाठविली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ५ .६.२००८**

(स्वाक्षरी)
**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

(शिक्का: राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अंकुश जनार्दन चव्हाण
मु.पो.को-हाळे बु., ता.बारामती, जि.पुणे-४१२१०३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, बारामती, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २११ / पुणे /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.१.२००८ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती, जि.पुणे
श्री.बी.जे.गोरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.८.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.८.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.९.२००६ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>मौजे को-हाळे बु., ता.बारामती, जि.पुणे येथील गट नं.३११ व ३१६ या महारवतन इनामवर्गाच्या शेतजमिनीच्या रेकॉर्डला अर्जदार यांच्या नावाच्या नोंदी कधी व कोणाच्या नावाने केल्या. महारवतन इनामवर्गाची नवीन शर्त व जुनी शर्त काय आहे याबद्दल शासनाची परिपत्रके, जमिनीला नवीन शर्त केव्हा लागू झाली, शर्त लागू होताना जमीन मालकांची सहमती घेतली होती काय, त्यांना नोटिसा दिल्या होत्या काय, शेतजमिनीचा बेकायदेशीर व्यवहार झाला त्या संदर्भातील कागदपत्राच्या प्रती. नोंदी रद्द करण्याबाबत सन २००२ मध्ये व त्यापूर्वी केलेल्या अर्जावर मला उत्तर दिले नाही यास जबाबदार कोण, दोषी कर्मचारी/अधिकारी यांची नावे व हुद्दा. भारतीय राजघटनेने मागासवर्गीयांना कायदेशीर संरक्षण दिलेले आहे, असे असताना त्यांना शेतजमिनींच्या उत्पन्नापासून का वंचित ठेवले आहे. |
|---|---|

## विवेचन

महार वतन इनाम वर्गाच्या शेतजमिनीला गैरअर्जदाराच्या नावाच्या नोंदी कधी, कोणाच्या नावाने, कोणी व कशा केल्या याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.अंकुश जनार्दन चव्हाण यांनी जनमाहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी जमीन संकलन विभागाकडून ही माहिती मागवून विहित मुदतीत अपीलकर्त्यास दिली. परंतु त्याने समाधान न झाल्यामुळे श्री.चव्हाण यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बारामती यांच्याकडे अपील केले. श्री.चव्हाण यांना माहिती देण्यात आली आहे. परंतु कागदपत्रांच्या नकला त्यांनी मागितल्या नसल्याने त्यांना देण्यात आल्या नव्हत्या, नकला हव्या असल्यास त्यांनी स्वतंत्र अर्ज करावा, असा अभिप्राय देऊन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील नामंजूर केले. त्याविरुध्द श्री.चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

'मला उत्तर न देण्यास जबाबदार कोण?' 'उत्पन्नापासून वंचित का ठेवले?' अशा स्वरुपाचे भाष्य अपेक्षित असलेले प्रश्न श्री.चव्हाण यांनी अर्जातील आठपैकी तीन मुद्दयांत विचारले आहेत. त्यावरही जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर दिले आहे. मात्र त्यांनी मागितलेल्या कागदपत्रांच्या प्रती दिलेल्या नाहीत. अर्जदाराने नकला मागितलेल्या नाहीत, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय

प्राधिकारी यांनी म्हटले आहे, ते चुकीचे आहे. श्री.चव्हाण यांनी प्रतींची मागणी स्पष्टपणे नोंदविलेली आहे. नवीन शर्त जाऊन जुन्या शर्तीवर जमीन १९६८ साली दिली. जुने सातबारा उतारे व फेरफार काढले पण शर्त सापडत नाही, तसेच त्याबाबतच्या नोटिसा सापडत नाहीत. ही 'ब' कागदपत्रे असून तीस वर्षे मुदतीपर्यंत ठेवली जातात, त्यामुळे ती उपलब्ध होत नाहीत, ७/१२ फेरफार हे कायमस्वरुपी अभिलेख असल्यामुळे ते उपलब्ध आहेत, असे जन माहिती अधिकारी श्री.बी.जे.गोरे यांनी सांगितले.

अपीलकर्त्याने म्हटल्याप्रमाणे जन माहिती अधिकाऱ्यांनी विलंब केलेला नाही, विहित मुदतीत उत्तर दिले आहे. मागितलेल्या कागदपत्रांच्या प्रतीबाबत अपीलकर्त्यानेही नंतर आग्रह धरल्याचे वा मागणी केल्याचे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसत नाही.

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) अपीलकर्त्याने मागितलेल्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास निःशुल्क द्याव्यात व पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२३.६.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१२ / सांगली | उपस्थिती |
| २ | अ पीलकर्ता | डॉ. ज्ञानचंद्र श्रीधर पाटील<br>शितल, दामाणी हायस्कूलचे पूर्वेस, चांदणी चौक,<br>जि. सांगली - ४१६ ४१६ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, मंडल कार्यालय, सांगली | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, मंडल कार्यालय, सांगली | हजर |

अपीलकर्ता डॉ. ज्ञानचंद्र श्रीधर पाटील यांनी विद्युत अधिनियम २००३ कलम १४० व १४१ नुसार प्राप्त तक्रारींची संख्या, तक्रार करणाऱ्यांची नावे इ. चार मुद्दयांची माहिती मागितली होती. सांगली जिल्हाधिकारी कार्यालयातील लोकशाही दिनातही डॉ. पाटील यांनी ही माहिती मागितली होती, तेव्हा दि. ३.११.२००७ रोजी माहिती दिली. परंतु तत्कालीन पूरपरिस्थितीमुळे माहिती देण्यास विलंब झाला, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ नुसार प्रसिध्द केलेल्या माहितीची संचिका पाहण्याचीही मागणी अपीलकर्त्याने केली होती. आज दि. १४.५.२००८ रोजी माहिती प्राप्त झाली असल्याचे व समाधान झाल्याचे अपीलकर्त्याने नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २४.६.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. बापू भाऊ चव्हाण
बी-२०, सुदामा को.ऑप.हौसिंग सोसायटी,
प्लॉट क्र. ७१/७२, शिवसृष्टी, कुर्ला,
(पूर्व), मुंबई

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
राधानगरी विभाग, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१६ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.१.२००८ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. बापू भाऊ चव्हाण
बी-२०, सुदामा को.ऑप.हौसिंग सोसायटी,
प्लॉट क्र. ७१/७२, शिवसृष्टी, कुर्ला, (पूर्व), मुंबई

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी
श्री. पंडित विष्णू आवळे

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
राधानगरी विभाग, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.३.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे वाघापूर, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथील गांवठाण प्लॉट मिळणेबाबत माहिती

## विवेचन

मौजे वाघापूर, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथील गांवठाण क्षेत्रातील भूंखडाच्या वाटपाबाबत माहिती मागणारा व आपल्याला भूखंड मिळावा, अशी मागणी करणारा अर्ज अपीलकर्ता श्री. बापू भाऊ चव्हाण यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, राधानगरी विभाग, कोल्हापूर यांच्याकडे केला होता. जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती कायम करून अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी श्री. चव्हाण यांचे अपील फेटाळले. त्याविरूध्द श्री. चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपण दि. २३.२.१९८७ रोजी कोल्हापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे भूखंड मागणीसाठी अर्ज केला होता. महाराष्ट्र शासनाने आपल्याला 'दलितमित्र' हा किताब दिला आहे. गोवा मुक्ती लढ्यातील आपण सैनिक असून जेष्ठ नागरिक आहोत. आपले वय ६८ वर्षे असून आपण मागासवर्गीय आहोत. तरीही आपल्याला भूखंड दिला जात नाही, अशी श्री. चव्हाण यांची तक्रार आहे. गेली पंचवीस वर्षे विविध पातळ्यांवर निवेदने, अर्ज आदी मार्गांनी आपण प्रयत्न करीत आहोत, असे श्री. चव्हाण यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले.

श्री. चव्हाण यांनी मागितल्यानुसार त्यांना वेळोवेळी माहिती देण्यात आली आहे. भुदरगड सन १९९२ पूर्वी गडहिंग्लज उपविभागामध्ये समाविष्ट होते, ते आता राधानगरी विभागात आहे. त्यामुळे उपविभागीय अधिकारी, राधानगरी विभाग, कोल्हापूर यांच्याकडून ही माहिती प्राप्त करून घ्यावी, असे जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांनी अपीलकर्त्यास कळविले. त्याविरूध्द त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर

यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकारी यांचे आदेशानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी तहसीलदार, भुदरगड यांच्याकडून माहिती प्राप्त करून घेऊन श्री. चव्हाण यांना पाठविली.

मौजे वाघापूर, ता. भुदरगड येथील गावठाण वाढ १९६४ साली मंजूर झाले व फेरगावठाण वाढ सन १९६६ साली झाली असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरून दिसून येते. चाळीस वर्षांपूर्वीचे हे वाटप असल्यामुळे त्यावेळी लावलेल्या निकषाबाबतचा खुलासा आता करता येणार नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगापुढे लेखी व तोंडी नमूद केले. संदर्भित गावठाणात एकूण १०१ भूखंड पाडण्यात आले होते, त्याचे वाटप झाले असून आज रोजी कोणताही भूखंड शिल्लक नाही, असे उपलब्ध कागदपत्रांवरून दिसून येते, असे अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर श्री. डी. डी. वळवी यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री. चव्हाण यांना अपेक्षित असलेली माहिती वेळोवेळी पाठविली आहे, तसेच संबंधित संचिका पाहणीसाठी उपलब्ध करून दिली होती, असे आयोगाला सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरून दिसून येते.

आपल्याला खोटी माहिती पुरविण्यात आली. हेतुतः वेळेवर माहिती दिली गेली नाही, आदी मुद्दे श्री. चव्हाण यांनी मांडले. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशावर दि. १८.५.२००७ अशी तारीख आहे. प्रत्यक्षात दि. ३१.७.२००७ रोजी ते टपालात टाकलेले दिसते, हे श्री. चव्हाण यांनी संबंधित लिफाप्यासह नमूद केले. मात्र माहिती व तारखा खोट्या असल्याचे त्यातून सिध्द होत नाही.

'मी वारंवार मागणी करूनही मौजे वाघापूर, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथील गावठाण क्षेत्रात अगर गायरान क्षेत्रात जागा उपलब्धीप्रमाणे अगर जागा नसल्यास ग्रामपंचायत व जिल्हा परिषद शाळा ह्यांच्यामध्ये जी मोकळी वीस हजार मीटर जागा आहे, त्यातील मला एका कोपऱ्यात ६० x ८० फुटाचा एक प्लॉट देण्यासाठी द्वितीय अपील राज्य माहिती आयुक्तांनी आदेश देऊन त्वरित जागा देण्याची व्यवस्था करावी. अगर कोल्हापूर शहरात मोकळ्या सरकारी प्लॉटपैकी मी मागणी केल्याप्रमाणे एक प्लॉट देण्याची व्यवस्था करावी व तसे आदेश द्यावेत,' असे श्री. चव्हाण यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. ही मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेता, आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

अपील अमान्य.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१२ .६.२००८

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. बाजीराव ना. शिंदे
गणेशखिंड, पुणे-४११ ००७

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा
पोलीस अधीक्षक, अहमदनगर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
पोलीस निरीक्षक, कोतवाली पोलीस स्टेशन,
अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.१.२००८ |

३ उपस्थित

**अपीलकर्ता** श्री. बाजीराव ना. शिंदे
गणेशखिंड, पुणे-४११ ००७

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, अहमदनगर
श्री. अशोक डोंगरे

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस निरीक्षक,
कोतवाली पोलीस स्टेशन, अहमदनगर
श्री. टी.के. वहिले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.६.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

कोतवाली पोलीस ठाणे येथे सौ. कल्पना शिंदे यांनी दि. १८.३.२००५ व दि. ३.४.२००५ रोजी दिलेल्या लेखी तक्रारी, दि. १९.४.२००५ रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांचेमार्फत कोतवाली पोलीस ठाणे यांचेकडे ३ वेळा माधवनगर, केडगाव येथील घरफोडी संदर्भात गुन्हेगारांवर कारवाई करणेकामी दिलेल्या लेखी तक्रारीवर काय कार्यवाही केली याची सविस्तर लेखी माहिती

## विवेचन

घरफोडीच्या संदर्भात पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीबाबत काय कार्यवाही केली, याची माहिती अपीलकर्ता श्री. बाजीराव ना. शिंदे यांनी जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, कोतवाली पोलीस ठाणे, अहमदनगर यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर न दिल्याच्या कारणावरून श्री. शिंदे यांनी प्रथम अपील केले. अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती देण्याचा आदेश देऊन अपील निकाली काढले. त्याविरूध्द श्री. शिंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००२ नुसार केलेले हे अपील आयोगाने केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये दाखल करून घेतले.

अपीलकर्ता श्री. शिंदे यांच्या पत्नी सौ. कल्पना शिंदे यांनी घरफोडीच्या संदर्भात तीन वेळा नगर पोलिसांकडे लेखी तक्रारी दिल्या होत्या. पोलिसांनी त्याची दखल घेतली नाही, असे श्री. शिंदे यांचे म्हणणे आहे. तसेच या अनुषंगाने कार्यवाहीची माहितीही दिली गेली नाही. आपल्याला वारंवार चकरा मारायला लावून प्रथम अपिलात कोणतीही सुनावणी न घेता अपुरी माहिती दिली. पाच कागदांच्या माहितीसाठी रूपये २५/- शुल्क आकारले, असे श्री. शिंदे यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. घरफोडी संदर्भात तक्रारी या घरगुती मामला असल्याचे व पोलीस निरीक्षकांसमोर त्याबाबत जाबजबाब झाल्याचे जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, कोतवाली पोलीस स्टेशन, अहमदनगर श्री. टी.के.बहिले व अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, अहमदनगर श्री. अशोक डोंगरे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. श्री. शिंदे यांच्या पत्यावर नोंदणीकृत टपालाने माहिती पाठविली होती, परंतु ते टपाल परत आले. दोन वेळा श्री. शिंदे पोलीस ठाण्यात येऊनही जबाबावर सही न करता 'परत येता' असे सांगून न थांबता निघून गेले. माहितीसाठी

त्यांनी अर्ज केल्यावर त्यांना पुन्हा पत्र पाठवून बोलावून घेतले. दि. १०.४.२००६ रोजी पोलीस ठाण्यात ते आले तेव्हा त्यांना समक्ष माहिती दिली, असे श्री. डोंगरे व श्री. वहिले यांनी लेखी व तोंडी अनुषंगिक कागदपत्रांसह नमूद केले. चौकशीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती देण्यात आल्या असून त्याची नक्कल फी रू.१८/- घेण्यात आली व ऊर्वरित रक्कम टपाल खर्चाची असल्याचे श्री. डोंगरे यांनी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २५.६.२००६

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२१ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. चंद्रकांत राऊ आयरे<br>घर क्र.२६०८, डी वॉर्ड, हळदकर गल्ली,<br>जुना बुधवार पेठ, कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | नगर भूमापन अधिकारी, कोल्हापूर, जि. कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधीक्षक, भूमि अभिलेख, कोल्हापूर, जि. कोल्हापूर |

अपीलकर्त्याची मूळ मागणी समाईक मालमत्तेच्या अनुषंगाने झालेल्या मोजणीच्या क्षेत्रफळाच्या दुरूस्तीबाबतची आहे. त्याबाबत वरील तीनही घटकांमध्ये झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील दाखल करून दाद मागावयाचे ठरलेले आहे.

प्रस्तुत विषयातील मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २८.६.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.११.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२२ + २२३ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री सुनिल मधुकर जगताप<br>२११, मुंढवा, पुणे-४११ ०३६ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, दौंड, जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, दौंड, जि. पुणे | हजर |

अपीलकर्त्याने दोन अर्जाद्वारे अनुक्रमे वीरबाजी पासलकर, आणि पानशेत व वरसगाव धरणग्रस्तांबाबत विविध मुद्दयांसंदर्भात माहिती मागितली होती. मूळ अर्जामध्ये माहितीसंदर्भात संदिग्धता असल्यामुळे अंशतः माहिती देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी प्रतिपादन केले. ऊर्वरित मुद्दयांविषयी समक्ष चर्चा केल्याने दहा दिवसांत अपीलकर्त्यास कार्यालयातील अभिलेख समक्ष दाखवून आवश्यक ती माहिती देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्त्याने त्यास मान्यता दिली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्याने स्पष्ट मागणी नोंदवावी. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास देय अशी ऊर्वरित सर्व माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून दहा दिवसांच्या आत निःशुल्क द्यावी.

पुणे
दि. ३०.६.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय रामचंद्र माने
द्वारा साप्ताहिक जनसेवा, राजवाडा,
कुरुंदवाड, कोल्हापूर-४१६१०६

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण संचालक, शिक्षण खाते,
पुणे-१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग,
जिल्हा कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२६/२२७ / कोल्हापूर /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख(विशेष अपील निर्गत मोहीम) | दि.१३.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय रामचंद्र माने
द्वारा साप्ताहिक जनसेवा, राजवाडा,
कुरुंदवाड, जिल्हा कोल्हापूर-४१६१०६

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण संचालक, शिक्षण खाते,
पुणे-१ श्री.एस.के.जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग,
जिल्हा कोल्हापूर श्री.पी.जी.साठे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.११.२००६ (अ.क्र.२२६)<br>दि. ४.७.२००७ (अ.क्र.२२७) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.११.२००६ (अ.क्र.२२६)<br>दि.३०.७.२००७ (अ.क्र.२२७) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सेवानिवृत्ती वेतन मिळणे बाबत. |
|---|---|

## विवेचन

ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन ( डीएड कॉलेज), कुरुंदवाड या संस्थेत सेवेला असतानाच्या काळातील माहितीची व अनुषंगिक कार्यवाहीची मागणी अपीलकर्ता श्री.दत्तात्रय रामचंद्र माने यांनी जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्याकडे केली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे श्री.माने यांनी प्रथम अपील न करता थेट राज्य माहिती आयोगाकडे अपिले केली आहेत.

श्री.माने यांचे वय ८१ वर्षे असून सन १९६० ते १९७३ या काळात ते संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य होते. सन १९७३ साली शिक्षण खात्याने या महाविद्यालयाची मान्यता काढून घेतली, तेव्हापासून सेवानिवृत्ती वेतन मिळण्याच्या मागणीसाठी आपण प्रयत्न करीत असूनही सेवानिवृत्ती वेतन न देण्याचा निर्णय शिक्षण, संचालक, कोल्हापूर उपविभाग, कोल्हापूर यांनी दि.१५.१२.१९९३ रोजी आपल्याला कळविला. या निर्णयाची कारणे, त्याबाबत तत्कालीन आमदार प्रा.ग.प्र.प्रधान यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाला विधिमंडळात दिल्या गेलेल्या उत्तराची प्रत मिळावी, सेवानिवृत्ती वेतन मिळावे, आदी मागण्या श्री.माने यांनी केल्या आहेत.

कोल्हापूर येथील विशेष अपील निर्गत कार्यक्रमात दि.१३.५.२००८ रोजी या अपिलांचा समावेश करण्यात आला होता. परंतु यामध्ये तडजोड न झाल्यामुळे नमुनापत्रात नमूद केलेल्या मा[illegible] बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे निर्णय घेण्यात आला.

[illegible] करीत असून ही माहिती ३० वर्षांपूर्वीची व शिक्षण, उपसंचालक [illegible]य, कोल्हापूर, उपविभाग, कोल्हापूर हे कार्यालय स्थापन होण्यापूर्वीची असल्याने, तसेच कार्यालयात उपलब्ध नसल्याने देता येत नसल्याचे त्यांना कळविण्यात आलेले आहे. १९८९ साली झालेल्या अतिवृष्टीमुळे शिक्षण विभागाच्या कार्यालयात पाणी शिरल्यामुळे सर्व अभिलेख भिजून नष्ट झाले आहेत. हे श्री. माने यांना पूर्वीच कळविण्यात आले आहे. या

संदर्भात श्री.माने यांनी केलेली तक्रार लोकायुक्तांनी दि.११.७.१९९७ रोजी निकाली काढली आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. अभिलेख नष्ट झाल्याचे आपल्याला जन माहिती अधिकारी यांनी कळविले नव्हते. मात्र लोकायुक्तांच्या दि.११.७.१९९७ च्या निकालपत्रात तसे नमूद आहे. परंतु दिलेली माहिती खोटी आहे, असे श्री.माने यांचे म्हणणे आहे. त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन ते सिध्द होत नाही. आपल्याला सेवानिवृत्ती वेतन व नुकसानभरपाई त्वरित मिळावी आणि आजपर्यंत ती न मिळण्यास कारणीभूत असलेल्या / उत्तर देण्यास वीस वर्षांचा कालावधी लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी, अशी श्री.माने यांची राज्य माहिती आयोगाकडील अपिलातील मुख्य मागणी आहे. प्रशासकीय कारवाईच्या या मागणीची दखल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत आयोगाला घेता येणार नाही. मात्र उत्तर देण्यास झालेल्या विलंबाबाबतच्या कारणांबाबतची माहिती त्यांना दिली गेली पाहिजे. तसेच विधिमंडळात दिलेले उत्तर आपल्या कार्यकक्षेतील नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केले असले तरी अपीलकर्त्याचे वय लक्षात घेता ते मिळवून देणे शक्य व आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिले अमान्य.

(२) अपीलकर्त्याच्या सन १९७३ च्या मागणी संबंधातील निर्णय घेण्यास वीस वर्षे एवढा अवधी लागण्याच्या कारणांची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी. तसेच प्रा.ग.प्र.प्रधान यांनी विधिमंडळात विचारलेल्या प्रश्नाला दिलेल्या उत्तराची प्रतही एक महिन्यात अपीलकर्त्यास द्यावी व पूर्तता अहवाल आयोगाला पाठवावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३.६.२००८
जून-२००८-७-९